दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक ३१२ वा शुक्रवार दि.२४ मे २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# मराठवाड्यातील धरणांत केवळ ९.६३ टक्के पाणीसाठा

छ. संभाजीनगर/मुंबई : राज्यातील सर्व धरणांमध्ये केवळ २४ टक्के पाणीसाठा शिल्लक असून १० हजारांहून अधिक वाड्या, गावांना टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. तर मराठवाडा पाणीटंचाईच्या झळांनी हैराण झाला असून मराठवाड्यातील एकूण ९२० लघू, मध्यम व मोठ्या धरणांमध्ये आता केवळ ९.६३ टक्के पाणी शिल्लक राहिले आहे. गेल्या वर्षी हाच साठा ३९.३३ टक्के एवढा होता.



राज्यात मागील वर्षी अपेक्षित पाऊस झाला नाही. त्यामुळे बहुतेक धरणे शंभर टक्के भरलीच नाहीत. त्यामुळे पावसाळ्यातही राज्याच्या काही भागात टँकरने पाणीपुरवठा सुरू होता. आता हे संकट अधिकच गडद झाल्याचे चित्र आहे. ग्रामीण भागासह अनेक शहरांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करावे लागले आहेत. जनावरांच्या चा-याचा प्रश्नही गंभीर बनत चालला आहे.

नागरिकांसह पशुधन पाण्याअभावी संकटात आले असून, लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत जीवनमरणाचा प्रश्न असलेल्या दुष्काळाकडे मात्र डोळेझाक करण्यात आली. जलसंपदा विभागाने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, मराठवाडा विभागात आज ६९९.३० दलघमी पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. पैठणच्या जायकवाडी धरणात आता ५.६५ टक्के पाणीसाठा उरला आहे. हिंगोलीमधील सर्वाधिक क्षमतेचे सिद्धेश्वर धरण शुन्यावर जाऊन पोहोचले आहे. तर येलदरी धरणातही आता २८.७६ टक्के पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. धाराशिव जिल्ह्याची तहान भागावणारी बहुतांश धरणे आता शुन्यावर पोहोचली आहेत. लातूरमध्ये अशीच अवस्था असून टँकरने पाणीपुरवठा वाढला आहे. परभणीचे निम्न दुधना धरणही शुन्यावर गेले आहे.

आचारसंहितेत सुट मिळण्याची सरकारची मागणी

दुष्काळाबाबत विविध उपाययोजना करणे तसेच याबाबत सध्या सुरू असलेल्या वेगवेगळ्या योजनाही पुढे सुरू ठेवण्याबाबत निर्णय घेण्यासाठी आचारसंहिता शिथिल होणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्य सरकारने निवडणूक आयोगाकडे विनंती केली आहे. आचारसंहिता शिथिल करावी, अशी मागणी सरकारने केली आहे. देशात सात टप्पे असून सातव्या टप्प्याचे मतदान १ जूनला आहे. तर चार जूनला मतमोजणी होणार आहे. तोपर्यंत देशात आचारसंहिता लागू असणार आहे. या कारणाने महाराष्ट्रात सरकारला दुष्काळासंबंधी उपाययोजना करण्यात अडचणी येत आहेत.

मान्सूनची प्रतीक्षा

राज्यात मराठवाडा विभागात सर्वात कमी पाणीसाठा शिल्लक राहिला असून मराठवाड्यानंतर पुणे, नाशिक कोकण विभागाचा धरणसाठा वेगाने कमी होत आहे. मान्सून राज्यात दाखल होण्यास अजून १५ दिवस शिल्लक असताना धरणसाठा वेगाने कमी होत आहे.

जनावरांच्या चा-याचा प्रश्न ऐरणीवर

जनावरांच्या पाण्याचे मोठे दुर्भिक्ष आहे. परिणामी पशुधन संकटात आले आहे. छत्रपती संभाजीनगर, नाशिक विभागात पाण्याचे संकट अधिक गंभीर होत असून पावसाकडे सर्वांचे डाळे लागले आहेत. सध्या मॉन्सूनपूर्व पाऊस सुरू असला तरी हा पाऊस मुरवणीचा नसल्याने पाणीसाठ्यात फारसा फरक पडत नाही.

टँकरव्दारे पाणीपुरवठा सुरू

सध्या २९३४ गावे आणि ६५३९ वाड्यांवर ३६२२ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जास्त असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाने दिली आहे. यात केवळ ९३ टँकर सरकारी तर ३५२९ खासगी टँकर्स आहेत. ज्या गावांमध्ये पाणीपुरवठा केला जात आहे तो केवळ पिण्यासाठी असून, छत्रपती संभाजीनगर विभागात तब्बल १२३६ गावे, ४९८ वाड्या तर नाशिक विभागात ७४६ गावे आणि २५३६ वाड्या तहानल्या आहेत. येथे अनुक्रमे १८१२ आणि ८०३ टँकरद्वारे पाणीपुवरठा केला जात आहे. पुणे विभागातील ३७७५ वाड्या, ६२८ गावांना ७४८ टँकरद्वारे पाणीपुवरठा सुरू आहे.

# बक्कळ पगाराचे आयआयटीयन्स झाले बेरोजगार!



नवी दिल्ली : दरवर्षी कोटी कोटींमध्ये पगार असलेल्या नोक-या मिळविणा-या आयआयटीच्या हुशार पोरांना यंदा कोणी विचारेनासे झाले असून २०२४ मध्ये पासआऊट झालेले सुमारे ७००० विद्यार्थी नोकरीविना बेरोजगार झाल्याची माहिती समोर आली आहे. आयआयटीच्या दारात रांगा लावणा-या कंपन्यांनी हात आखडते घेतल्याने आयआयटी प्लेसमेंटमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.देशभरात २३ आयआयटी आहेत. या संस्थांमधील जवळपास ३८ टक्के विद्यार्थ्यांना कॅम्पस प्लेसमेंटच मिळालेली नाही. आयआयटी कानपुरच्या माजी विद्यार्थ्याने आरटीआयद्वारे याची माहिती मागितली होती. यामध्ये ही धक्कादायक आकडेवारी आली आहे. देशात कमालीची बेरोजगारी असल्याची आकडेवारी नुकतीच आली होती. यात आयआयटीच्या लोकांनाही कोणी नोक-या देईना म्हटले तर नवल वाटायला नको असे माहिती अधिकारातल्या आकडेवारीवरून वाटत आहे. आयआयटी दिल्लीने आपल्या माजी विद्यार्थ्यांना मेल करून २०२४ च्या विद्यार्थ्यांना नोकरी बघण्यास व कंपन्यांकडे रेफरन्स देण्याबाबत कळविले आहे. एवढेच नाही तर आयआयटी मुंबई, बिर्ला इन्स्टिट्यूट यांनी देखील आपल्या माजी विद्यार्थ्यांशी संपर्क साधला आहे.दरम्यान देशातल्या एकूण बेरोजगारांपैकी सुमारे ८३% हे तरूण बरोजगार आहेत आणि त्यांच्यातही सुशिक्षित बेरोजगार माध्यमिक किंवा उच्च शिक्षण घेतलेल्यांची संख्या वाढल्याचे एका अहवालातही सांगण्यात आले आहे. आयआयटीसमोर मोठे आव्हान दिल्ली आयआयटीने यंदाचे प्लेसमेंट संपत आले तरी आमच्यासमोर मोठे आव्हान आहे. आम्ही अनेक प्रयत्न केले तरी ४०० विद्यार्थ्यांना अजून नोकरी मिळालेली नाही. यामुळे आम्ही माजी विद्यार्थ्यांना संपर्क करत आहोत असे मेलमध्ये म्हटले आहे. तुमची मदत मिळाली तर विद्यार्थ्यांना नोकरी मिळू शकेल आणि ते करिअर सुरु करू शकतील, असे यामध्ये नमूद केले आहे.अनेक संस्थेत प्लेसमेंट सुरूच बिर्ला इन्स्टिट्यूटने दोन महिन्यांपूर्वीच माजी विद्यार्थ्यांना संपर्क केला होता. मुंबई आयआयटीमध्ये प्लेसमेंट अजून सुरु आहे. ती जूनच्या अखेरपर्यंत चालू राहणार आहे. अद्याप २५० विद्यार्थ्यांना नोकरी मिळालेली नाही. २३ आयआयटीमध्ये ७,००० हून अधिक आयआयटी विद्यार्थ्यांना या वर्षी कॅम्पस प्लेसमेंटद्वारे नोक-या मिळू शकलेल्या नाहीत.

दोन वर्षांत दुपटीने वाढ दोन वर्षांपूर्वी ही संख्या ३,४०० होती. चॅटजीपीटीचे हे पहिले परिणाम करणारे वर्ष आहे. दोन लोक तीन लोकांचे काम करू शकत असतील, तर आम्ही आधीच ३०% ने भरती कमी केली आहे. तसेच आधीच भरती खूप झाली आहे. शिवाय निवडणुका आहेत.

# पाकिस्तानची ताकद तपासण्यासाठी मी लाहोरला गेलो होतो; मोदी

नवी दिल्ली : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मणिशंकर अय्यर यांचा एक जुना व्हिडीओ काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. पाकिस्तानकडे अणुबॉम्ब आहे, त्यामुळे भारताने त्यांचा आदर केला पाहिजे, असे मणिशंकर अय्यर यांनी म्हटले होते. यावर आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका मुखातीदरम्यान, मजेशीर उत्तर दिले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी २०१५ ला अफगाणिस्तानहून परतताना अचानक लाहोरला पोहोचले होते. त्यावेळी त्यांनी तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांची भेट घेतली होती. २५ डिसेंबर रोजी नवाझ शरीफ यांचा वाढदिवस असतो. त्यामुळे पंतप्रधान मोदींनी नवाझ शरीफ यांची भेट घेऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या होत्या आणि त्यांच्या आईला भेटवस्तूही दिल्या होत्या. त्यांच्या या भेटीची जोरदार चर्चा झाली. विरोधकांनी मोदींवर टीकाही केली होती. पंतप्रधान मोदींच्या लाहोर भेटीकडे पाकिस्तानशी संबंध सुधारण्याचा एक पुढाकार म्हणून पाहिले जात होते. मात्र, पठाणकोट, उरी आणि त्यानंतर पुलवामासारख्या दहशतवादी हल्ल्यांमुळे भारत आणि पाकिस्तानमधील संबंध सुधारू शकले नाहीत. उलट ते अधिकच खराब होत राहिले. मात्र लाहोर भेटीचा मोदींनी इंडिया टिव्हीला दिलेल्या मुलाखतीत उल्लेख केला आणि मणिशंकर अय्यर यांच्या वक्तव्यावर मजेशीर उत्तर दिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, मी स्वतः लाहोरला जाऊन त्यांची ताकद तपासली आहे. तिथे एक रिपोर्टर हाय अल्ला तौबा, हाय अल्लाह तौबा म्हणत होता. मोदी व्हिसाशिवाय पाकिस्तानात कसे आले? परंतु पाकिस्तानला घाबरायचे कशाला? एके काळी पाकिस्तान भारताचाच भाग होता, असेही मोदी म्हणाले. दरम्यान, एका निवडणूक प्रचार सभेतही पंतप्रधान मोदींनी मणिशंकर अय्यर यांच्या वक्तव्यावर भाष्य केले होते. ते म्हणाले होते की, काँग्रेसचे लोक पाकिस्तानचा आदर आणि भीती बाळगण्याविषयी बोलतात. त्यामुळे आम्ही त्यांना बांगड्या घालायला लावू. पाकिस्तानला घाबरायचे कशाला? असा प्रश्न उपस्थित केला होता. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारातही अनेकवेळा पाकिस्तानचा उल्लेख करण्यात आला आहे. याशिवाय केंद्रीय गृहमंत्री अमित शहांसह अनेक मंत्र्यांनी पुढचे सरकार पीओके काढून घेण्याचे काम करेल, असे म्हटले आहे.



# लातूर शहरात बुद्ध जयंती सोहळा उत्साहात संपन्न






लातूर :- शांतीचे अग्रदुत, महाकारूणीक, विश्ववंदनीय तथागत गौतम बुध्दांचा जन्म वैशाख पौर्णिमेला इ.स. पूर्व ५६३ मध्ये झाला. शील, सदाचार, करूणा, मैत्री आणि शांततेची शिकवण हे भगवान बुध्दांचे व्यावहारिक व आध्यात्मिक तत्वज्ञान असुन समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि सामाजिक न्याय तथागत बुध्दांचा समग्र जगाला वैश्विक संदेश आहे. भगवान बुध्द संपूर्ण आशिया खंडाचे दिपस्तंभ (ड्ळसहीं ेष -ीळर)च ठरले आहेत. समाजास बुध्दीप्रामाण्यवादी, विज्ञानवादी आणि सुसंस्कारी बनवने हे बुध्द शिकवणीचे ध्येय आहे. अशा या भारताच्या महत्तम युगप्रवर्तक महामानव ठरलेल्या तथागत भगवान बुध्दांची जयंती आज जगभरात मोठ्या उत्साहात साजरी होतांना लातूर शहरातही मोठया उत्साहात पु. भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांच्या सौजन्याने तथागत बुद्ध जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस भंते बुद्धशील यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पंचशील धम्मध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी धम्मसंदेश रॅली काढण्यात आली. या वेळी हजारोच्या संख्येने बौद्ध उपासक, उपासिका शुभ्र वस्त्र परिधान करून सहभागी झाले होते. या धम्मसंदेश रॅलीमध्ये समता सैनिक दलाचीही परेड झाली. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती मंडळातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अपर्ण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. पु. भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. त्रिशरण पंचशीलानंतर शुभेच्छापर बोलताना भिक्खु पय्यानंद थेरो यांनी सर्व भारतीयांना बुद्ध जयंतीच्या शुभेच्छा दिल्या व धम्मसंदेश रॅलीचा समारोप करण्यात आला. यावेळी केशव कांबळे, विनोद खटके, भिमराव चौदंते, सुजाता अजनीकर, प्रा. देवदत्त सावंत, सुशील चिकटे, कुमार सोनकांबळे, जि.एस. साबळे, शोभा सोनकांबळे, वसंत वाघमारे, पांडुरंग अंबुलगेकर, साधू गायकवाड, लाला सुरवसे आदीसह मोठया संख्येने उपासक उपासिका उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंती मंडळाचे जितेंद्र बनसोडे, असित कांबळे, रमक जोगदंड, आनंद सोनवणे, राहुल डुमने, विजय चौधरी, सिद्धार्थ सूर्यवंशी, करन ओव्हाळ, विनोद कोल्हे, राजू सूर्यवंशी, राहुल शाक्यमुनी, अशोक कांबळे, ज्योतीराम लामतुरे, अनिरुद्ध बनसोडे, अरुण कांबळे, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, उदय सोनवणे, मिलिंद धावारे यांनी परिश्रम घेतले.

# कर्करोगविरोधी औषध ‘ओलापरिब टॅब्लेट’ मागे घ्या

नवी दिल्ली : ड्रग कंट्रोलर जनरल ऑफ इंडिया- डीसीजीआयने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील औषध नियामकांना, तीन किंवा अधिक वेळा केमोथेरपी दिलेल्या रुग्णांच्या उपचारांसाठी अॅस्ट्राझेनेकाचे कर्करोगविरोधी औषध ओलापरिब गोळ्या परत मागवण्याचे निर्देश दिले आहेत.




संभाव्य प्रतिकूल परिणामांमुळे, जीबीआरसीए उत्परिवर्तन आणि प्रगत गर्भाशयाचा किंवा स्तनाचा कर्करोग असलेल्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी उत्पादकाने या औषधाचे विपणन करणे थांबवले आहे, याची खात्री करण्यासाठी राज्य नियामकांना निर्देश दिले आहेत. ड्रग रेग्युलेटरच्या मते, इतर मंजूर लक्षणांसाठी औषधाची विक्री सुरू ठेवली जाऊ शकते. १६ मे रोजी नियामकांना पाठवलेल्या पत्रात, डीसीजीआयने सांगितले की फर्म अॅस्ट्राझेनेका फार्मा इंडियाने त्यांना ओलापरिब टॅब्लेट मागे घेण्यासाठी अर्ज सादर केला आहे. यासाठी फर्मने काही क्लिनिकल पुरावेही सादर केले.

## संपादकीय....

# गौतम बुद्धांच्या जीवनातून हे शिका

प्रत्येक व्यक्तीमध्ये एक बाल बुद्ध बसलेला असतो. बुद्ध होण्यापूर्वी ते राजकुमार सिद्धार्थ होते. अगदी लहान वयात सिद्धार्थला समजले की 'सर्व काही दुःख आहे'. त्यांच्या अंतःकरणात ज्ञानाची इच्छा होती, ते ज्ञानासाठी भटकत होते. 'संपूर्ण जग दुःखी आहे आणि मला या दुःखातून मुक्त व्हायचे आहे', असे ते म्हणाले. पण त्यांना दुःखातून बाहेर पडण्याचा मार्ग माहीत नव्हता. प्रत्येक व्यक्तीच्या आत एक बाल बुद्ध असतो, त्यांना फक्त जागृत करावे लागते.

इच्छांशी लढू नका, त्यांचे साक्षी बना.एक कथा अशी आहे की जेव्हा बुद्ध बोधिवृक्षाच्या खाली बसून ध्यान करत होते आणि आत्मज्ञानाच्या शेवटच्या टप्प्यात होते, तेव्हा 'मार' नावाच्या राक्षसाने बुद्धाची समाधी तोडण्याचा प्रयत्न केला, परंतु नंतर बुद्धाने आपल्या बोटाने जमिनीला स्पर्श केला आणि साक्षी बनण्यास सांगितले. जसे भूमी भगवान बुद्धांच्या आसनाची साक्षी बनली, राक्षस मार समाप्त झाला आणि भगवान बुद्धांना आत्मसाक्षात्कार झाला. या घटनेला सखोल अर्थ आहे! 'मार'! भगवान विष्णूला 'मारजनक' म्हणतात, ते 'काम' चे पिता मानले जातात आणि शिव हे कामाचे नाश करणारे मानले जातात त्यामुळे त्याना मारांतक म्हणतात. बुद्धांनी या दोघांमधील मार्ग स्वीकारला आणि 'मार' चे 'साक्षी' बनले! म्हणून बुद्धांनी तीच गोष्ट सांगितली की इच्छांना मारण्याची नव्हे तर त्यांचा साक्षीदार होण्याची गरज आहे. जसे इच्छांचे आपण साक्षी बनू, तशी इच्छा आपोआप नाहीशी होते.जीवनात समाधानी असणे हे निर्वाण आहे.

निर्वाण म्हणजे आपल्या सर्व भावनांचे साक्षी बनणे. भगवान बुद्धांनी स्वतः या भूमीला साक्षीदार बनवले. 'साक्षी' हे बोट दाखवण्याचे काम आहे, त्यासाठी हातोडीची आवश्यकता नसते; साक्षीदार होण्यासाठी लढण्याची गरज नाही. लोकांना कामाचा मनस्ताप होत आहे. मन शांत द्वैत चेतनेत आल्यावर सर्व इच्छा नाहीशा होतात. म्हणूनच जेव्हा आपण शांत आणि समाधानी असतो तेव्हा आपण मुक्त होतो. तर अशा प्रकारे संतुष्ट होणे म्हणजे निर्वाण आहे.

ज्यांना 'माहिती' आहे त्यांना शब्दात सांगण्याची गरज नाही. वैशाख पौर्णिमेच्या दिवशी जेव्हा बुद्धांना ज्ञान प्राप्त झाले, तेव्हा ते शांत झाले. आठवडाभर ते काहीच बोलले नाहीत. पुराणांमध्ये असे मानले जाते की या शांततेमुळे स्वर्गातील देवी-देवतांना काळजी वाटू लागली की हजारो वर्षांत एकदा कोणीतरी बुद्धासारखे पूर्णपणे बहरते आणि आता या स्थितीत आल्यानंतरही ते शांत झाले आहेत. ते एक शब्दही बोलत नाहीत. असे म्हटले जाते की ते बुद्धाकडे गेले आणि त्यांनी बुद्धांना प्रार्थना केली की 'कृपया काहीतरी बोला'.बुद्ध म्हणाले, 'ज्यांना माहीत आहे त्यांना माझ्या बोलण्याशिवाय कळेल, आणि ज्यांना माहीत नाही त्यांना मी बोललो तरी कळणार नाही'. अंध व्यक्तीला जीवनाची कोणतीही व्याख्या करणे निरर्थक आहे. ज्या व्यक्तीने अस्तित्वाचा अमृत चाखलेला नाही अशा व्यक्तीशी याबद्दल बोलण्यात काही अर्थ नाही. त्यामुळे मी गप्प आहे. 'तुम्ही इतकी खोलवर गोष्ट कशी व्यक्त करू शकता, ती शब्दांमध्ये व्यक्त केली जाऊ शकत नाही.'जिथे सत्याची सुरुवात होते तिथे शब्द संपतात', असे भूतकाळातील अनेक शास्त्रांनी म्हटले आहे.' 'आम्ही सहमत आहोत', ते म्हणाले. तुम्ही जे म्हणत आहात ते बरोबर आहे; परंतु कृपया सीमा रेषेवर असलेल्यांचा विचार करा. ते पूर्णपणे ज्ञानी किंवा पूर्णपणे अज्ञानी नसतात. तुमचे शब्द त्यांना प्रेरणा देतील. त्यांना काहीतरी सांगा. मग बुद्धांनी ज्ञानाचा प्रसार करण्याचा आणि तो सामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्याचा निर्णय घेतला.जेव्हा इतकी समृद्धी होती, तेव्हा बुद्धांनी आपल्या प्रमुख शिष्यांना भिक्षापात्र दिले आणि त्यांना 'जा आणि भिक्षा मागा!' असे सांगितले. त्यांनी राजांची शाही वस्त्रे काढून घेतली आणि वाडगा त्यांच्या हातात दिला. असे नव्हते की त्यांना अन्नाची गरज होती, परंतु त्यांना 'मी काहीतरी आहे' ते 'मी काहीच नाही' हे शिकवायचे होते. तुम्ही काहीच नाही; तुम्ही या विश्वात 'क्षुल्लक' आहात. जेव्हा त्या काळातील राजे आणि प्रतिभावंतांना भीक मागण्यास सांगितले गेले, तेव्हा ते सर्व करुणेचे अवतार बनले.

# : ड्रॅगनचा व्यापार विळखा

भारताची चीनमधून होणारी आयात उच्चांकी पातळीवर पोहोचली असून, सहाजिकच त्यावरील आपले अवलंबित्व वाढत आहे. ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे आत्मनिर्भरतेवर भर आणि आयातीत मालाबाबत कडक धोरणात्मक कार्यवाही गरजेची आहे.

पुन्हा एकदा भारताची व्यापार तूट वाढल्याची बातमी नुकतीच झळकली, पण यंदाची बातमी जरा जास्तच चिंताजनक आहे. भारताने गेल्या काही महिन्यात केलेल्या निर्यातीमध्ये केवळ एक टक्काच वाढ झाली; तर आयातीमध्ये दहा टक्क्यांनी वाढ झाली. म्हणजे निर्यातीपेक्षा दहापट आयात वाढल्याचे निदर्शनास आले. सोन्याच्या आयातीचा टक्का काही प्रमाणात वाढला; पण इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या आयातीचा टक्का फार मोठ्या प्रमाणात वाढला.एका अलिखित नियमाप्रमाणे इलेक्ट्रॉनिक वस्तूंची आयात म्हणजे चीनकडूनच, असे मानले जाते. त्या प्रमाणेच भारतातील इलेक्ट्रॉनिक वस्तूंची आयात चीनमधून मोठ्या प्रमाणात वाढली असल्याचेही नवीन अहवालात दिसून आले आहे.भारत चीनमधून आयात वस्तूंवर निर्भर होत चालला आहे, असेच परखड मत एका प्रतिथयश संस्थेच्या अहवालामध्ये मांडण्यात आले आहे. त्या अहवालामध्ये अशी परिस्थिती धोक्याची घंटा असू शकते, असे देखील नमूद करण्यात आले आहे.

चीनमध्ये इलेक्ट्रॉनिक वस्तू किंवा इलेक्ट्रिकल वाहने आणि त्यासाठी लागणाऱ्या बॅटरीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात, स्वस्तात केले जाते. बऱ्याच वेळेला त्याच्या गुणवत्तेचा विचार केला जात नाही, परंतु जगाला या वस्तूंची गरज आहे आणि आपण त्या स्वस्तात निर्माण करून तिथे पाठवू शकतो, या भूमिकेतून चीनने मोठ मोठ्या प्रमाणात 'स्पेशल इकॉनॉमिक झोन' (एसईझेड) तयार करीत आपली उत्पादन क्षमता वाढवली आहे. ती उत्पादने ते जगात मोठ्या प्रमाणात निर्यात करत आहेत. १३ मे रोजी प्रसिद्ध झालेल्या एका बातमीनुसार, चीन भारताचा अमेरिकेपेक्षा जवळचा व्यापारी मित्र बनला आहे. मार्च २०२४ मध्ये संपलेल्या आर्थिक वर्षात चीन आणि भारत यांच्या दरम्यान ११८.४ अब्ज डॉलरचा व्यवहार झाला. त्यामध्ये भारतातून चीनमध्ये १६.७ अब्ज डॉलरच्या वस्तू निर्यात करण्यात आल्या; तर भारतामध्ये चीनमधून १०२ अब्ज डॉलरच्या वस्तू आयात करण्यात आल्या.दुसरीकडे अमेरिकेचा भारताबरोबरचा व्यवहार कमी झाल्याचे या अहवालात म्हटले आहे. अमेरिकेच्या तुलनेत चीनमधून येणाऱ्या स्मार्टफोन, लॅपटॉप इत्यादी वस्तूंची आयात फार मोठ्या प्रमाणात वाढल्याचा उल्लेख अहवालात असल्याचे बातमीत म्हटले आहे.

चीनकडून नियमाचा गैरफायदा जागतिक व्यापार संघटनेच्या (डब्ल्यूटीओ) उद्देशाप्रमाणे कोणताही सभासद देश एकमेकांच्या वस्तूंवर कररुपी बंधन लादू शकत नाही. ते खुल्या व्यापार धोरणाच्या विरोध आहे आणि त्याचाच गैरफायदा चीन मोठ्या प्रमाणात घेत आपल्या कमी खर्चात उत्पादीत केलेल्या वस्तू इतर देशात पाठवत आहे. त्यात भारत हा चीनचा शेजारी देश असल्या कारणाने चीनच्या वस्तूंच्या दळणवळणावरील खर्चसुद्धा कमी होतो.भारतात चिनी उत्पादने अत्यल्प किमतीत इतर देशांच्या मानाने उपलब्ध होतात. जपान व दक्षिण कोरिया यांसारख्या देशांमध्ये सुद्धा इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे उत्पादन केले जाते. परंतु त्या देशांचे भारतापासून भौगोलिक अंतर अधिक आहे. शिवाय हे देश गुणवत्ता निकषांबाबत अत्यंत कडक धोरण अवलंबतात.त्यामुळे त्यांच्या उत्पादनांची किंमत वाढलेली असते. याच आर्थिक असमानतेचा फायदा घेऊन चीन त्यांच्या वस्तू भारतासह इतर देशांमध्ये मोठ्या प्रमाणात उतरत आहे, डंप करत आहे.भारतामध्ये सध्या इलेक्ट्रिक वाहने वापरण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. त्यासाठी लागणाऱ्या वस्तूंची, विशेष करून बॅटरीची मागणी वाढत जाणार आहे. भारताला चीनच्या अधिकाधिक स्वस्त बॅटरीवर कदाचित अवलंबून राहावे लागेल. तसेच भारतामध्ये सौर ऊर्जेचा प्रसार मोठ्या प्रमाणात चालू आहे.अशा वेळेला सौर ऊर्जा निर्मितीसाठी, विशेष करून त्याच्या पॅनलला लागणाऱ्या सिलिकॉन सारख्या घटकांची निर्मिती अतिशय स्वस्तात आणि खूप मोठ्या प्रमाणात चीनमध्ये सध्या सुरू आहे. म्हणजे उद्या सौरऊर्जेच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या अनेक घटकांसाठी सुद्धा चीनवरचं अवलंबित्व वाढत जाऊ शकते.चीन पुढच्या अनेक दशकांची योजना घेऊन जगभरात आपल्या वस्तू घेऊन जात आहे आणि भारतही त्याला अपवाद नाही. उलट सध्याच्या प्रकाशित बातमी व अहवालावरून असे जाणवते आहे की, भारताची व्यापार तूट ही चीनने निर्यात केलेल्या वस्तूंमुळे वाढली आहे आणि ती पुढील काळात आणखी वाढत जाणार आहे.

हव्या धोरणात्मक सुधारणा चीनचा धूर्तपणा ओळखून अमेरिकेने चीनमधून येणाऱ्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंवर १००% आयात शुल्क लावण्याचा निर्णय नुकताच घेतला. ज्यामुळे चीनमधील उत्पादित वस्तू अधिक किमतीला अमेरिकेत उपलब्ध होतील आणि अमेरिकेमध्ये उत्पादित होणाऱ्या इलेक्ट्रॉनिक वस्तू चिनी वस्तूंपेक्षा स्वस्त असतील. अमेरिकेने स्वदेशी व्यावसायिक संरक्षण या 'डब्ल्यूटीओ'च्या तरतुदीचा उपयोग करत हा कर लागू केला आहे.त्याचबरोबर त्यांनी गुणवत्ता मानके, हाही मुद्दा अधिक शुल्कासाठी मांडला आहे. जेणेकरून चीनला सहजासहजी 'डब्ल्यूटीओ'च्या न्यायनिवाडा समितीसमोर जाता येणार नाही. अमेरिकेने व्यावसायिक तसेच आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भरतेच्या अनुषंगाने अधिक आयात शुल्काचे पाऊल उचलले आहे, तसे भारत करू शकेल का?

अशा स्वरुपाच्या उपाययोजना जर भारताने केल्या नाही तर नक्कीच चिनी ड्रॅगनचा भारताभोवतीचा व्यापार विळखा वाढल्याशिवाय राहणार नाही. चीनमधून वाढलेली आयात चिंतेचा विषय आहे. त्यामुळे भारतीय व्यापारी वर्गाने चिनी वस्तूंची आयात कमी करावी, असे आवाहन भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी नुकतेच कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीजसमोर (सीआयआय) बोलताना केले आहे. भारताच्या सीमेवर चिनी उपद्रव वाढत असताना त्यांच्या उत्पादनांची आपल्याकडे आयात वाढणे म्हणजे अप्रत्यक्षरित्या चीनला सक्षम करणे आहे, असे त्यांचे मत रास्तच आहे. चीनने अमेरिकी आणि जपानी इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा अभ्यास करीत आपल्याकडे त्या वस्तूंचे उत्पादन अत्यंत कमी किमतीत सुरू केले, तसे भारताला चीनमध्ये उत्पादित वस्तूंचा अभ्यास करून भारतातच तुलनेने स्वस्तात त्यांची निर्मिती करता येईल का? हे तपासावे.त्यासाठी सरकारने योग्य त्या उपाययोजना करणे गरजेचे आहे. दुर्दैवाने सध्या वाणिज्य मंत्रालयाचे निर्णय धरसोडीचे असल्याचे आपल्याला अनेकदा जाणवले आहे. कांदा निर्यात किंवा बासमती तांदळाच्या आयात-निर्यात धोरणातही ते दिसते. त्याचे फटके आपल्या अर्थव्यवस्थेला बसत आहेत. त्यामुळे सरकारनेच धोरणात्मक आणि दूरदर्शी पावले उचलणे गरजेचे आहे.




# नियोजनशून्यतेचा फुफाटा

पन्नास टक्क्यांच्या आसपास मतदान होत असताना यंत्रणेचा बोजवारा उडत असेल तर उद्या ऐंशी किंवा शंभर टक्के मतदार मतदानासाठी उतरले तर काय अवस्था ओढवेल याची कल्पनाच केलेली बरी. मतदानासाठी अनेक ठिकाणी दोन तासांहून अधिक काळाचा विलंब, विविध केंद्रांवर लागलेल्या लांबच लांब रांगा, मूलभूत सोयीसुविधांचा अभाव, या गोष्टींमुळे मुंबईत मतदारांचे प्रचंड हाल झाले. आधीच उन्हाचा तडाखा आणि त्यात नियोजनशून्यतेचा फुफाटा, अशी त्यांची अवस्था झाली. खरे तर या सर्वच व्यवस्थापनातील ढिसाळपणाची सखोल चौकशी होऊन जबाबदार असलेल्यांना शिक्षाच व्हायला हवी.पण अशा प्रकारचे उत्तरदायित्वच आपल्याकडे अद्याप रुजलेले नाही. देशातातील सार्वत्रिक निवडणुकीला लोकशाहीचा जगातील सर्वात मोठा उत्सव मानले जाते. मतदानाचा अधिकार असलेले-नसलेले लहान थोर, गरीब-श्रीमंत सगळेच या उत्सवात वेगवेगळ्या पद्धतीने सहभागी होत असतात. पहिली सार्वत्रिक निवडणूक १९५२ मध्ये पार पडली. केंद्रीय निवडणूक आयोगाला तेव्हापासून निवडणुका घेण्याचा अनुभव आहे.आतापर्यंत सतरा सार्वत्रिक निवडणुका, विधानसभेच्या चारशेहून अधिक निवडणुका, राष्ट्रपती-उपराष्ट्रपतींच्या सोळा निवडणुका निवडणूक आयोगाने यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. अशी कामगिरी गाठीशी असताना मुंबईत उडालेला नियोजनाचा बोजवारा धक्कादायक आहे. खरे तर इतक्या निवडणुकांचा अनुभव असल्याने त्याचा फायदा घेऊन व्यवस्थेत सतत योग्य ते बदल करणे अपेक्षित आहे.एका तासात किती मतदान होऊ शकते, याचा काही अंदाज आयोगाने घेतला होता का? घेतला असेल तर प्रत्यक्षात एवढा गोंधळ का उडावा? लोकांना रांगेत तिष्ठत का उभे राहावे लागले? यंत्रणा राबविण्यातील हे ढळढळीत अपयश म्हणावे लागेल. पुणे-मुंबईसारख्या शहरी भागात आधीच मतदान कमी प्रमाणात होते. ही गोष्टी चांगली नाहीच. पण अव्यवस्थेमुळे हे प्रमाण आणखी घटण्याचा धोका आहे.केंद्रीय निवडणूक आयोग किती मोठ्या यंत्रणेसोबत काम करतो आणि देशातील लोकशाहीच्या प्रक्रियेमध्ये योगदान देतो, असे कौतुक करणे म्हणजे वारंवार परीक्षा देणाऱ्या आणि तीन तासांच्या पेपरला पूर्णवेळ ठाण मांडून बसलेल्या विद्यार्थ्याचे कौतुक करण्यासारखे होईल. संबंधित विद्यार्थ्याचे मूल्यमापन जसे त्याच्या परीक्षेतील गुणावरून ठरते, तसे निवडणूक यंत्रणेचे मूल्यमापन ही प्रक्रिया किती सुरळीतपणे पार पडली यावरून व्हायला पाहिजे. लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदानाच्यावेळी मुंबई आणि परिसरात जे काही घडले त्यामुळे आयोगाची पुरती शोभा झाली आहे. कोणत्याही निवडणुकीतील मतदानाची टक्केवारी मतदान संपल्यानंतर तासाभरात देण्याची आजवरची पद्धत होती. त्यानंतर दुस-या दिवशी सायंकाळपर्यंत त्यात सुधारणा करून अंतिम आकडेवारी दिली जाई. यावेळी मात्र आयोगाने प्रत्येक टप्प्यानंतर मतदानाच्या टक्केवारीमध्ये सातत्याने बदल केले आणि पुढचे आठ-दहा दिवस त्यात बदल होत राहिले. ईव्हीएमच्या माध्यमातून सत्ताधारी पक्ष गैरप्रकार करीत असल्याचे आरोप होताहेत. अशात मतदानाची टक्केवारी आठवडाभरानंतर पाच-सात टक्क्यांनी वाढत असेल तर तो आयोगाने सत्ताधाऱ्यांच्या सोयीसाठी केलेला गैरव्यवहार असल्याचा लोकांचा समज झाला, तर त्यात लोकांना दोष देता येणार नाही.कायद्यांना मुरड घालून आयोगावरील लोकांची कशा रीतीने नियुक्ती झाली आहे, याच्या सुरस कथा यापूर्वी प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यामुळे त्यांची विश्वासार्हता ढासळणार यात आश्चर्य नाही. सत्ताधाऱ्यांच्या मेहेरबानीमुळे आयोगावर नियुक्त झालेल्या माणसांबद्दल सार्वत्रिक अविश्वासाची भावना आहे. निवडणूक आयोग भाजपच्या हातातील बाहुले बनले आहे, अशी टीका केली जात असताना आयोगाने किमान निवडणूकयंत्रणा प्रभावीपणे राबवून कार्यक्षमता सिद्ध करावयास हवी होती. परंतु त्या पातळीवरही काहीच झाले नाही. मतदान करा म्हणून प्रचारयंत्रणा राबवली गेली. परंतु केंद्रावर गेलेल्या मतदारांना मनस्ताप सहन करावा लागला.मुंबईतील असह्य उकाड्यात मतदारांना दोन-अडीच तास रांगेत उभे करणे हे गुन्हेगारी कृत्य आहे आणि त्याला आयोगाची अकार्यक्षमता कारणीभूत आहे. उष्माघातामुळे अनेकांना रुग्णालयात दाखल करावे लागले आणि दक्षिण मुंबईत पोलिंग एजंटचा मृत्यू झाला.याची जबाबदारी कोण घेणार? पन्नास टक्क्यांच्या आसपास मतदान होत असताना यंत्रणेचा बोजवारा उडत असेल तर उद्या शंभर टक्के मतदार मतदानासाठी उतरले तर काय अवस्था ओढवेल याची कल्पना केलेली बरी. याचा अर्थ आयोगही कमी मतदान गृहीत धरूनच सारे नियोजन करतो काय? निवडणूक कर्मचाऱ्यांच्या हालाला तर पारावार नसल्याचे चित्र आहे. मतदान केंद्रांवर साधी स्वच्छतागृहांची व्यवस्था नसते, प्राथमिक सुविधा नसतात. महिला कर्मचाऱ्यांची कुचंबणा होत असते. कोणताही उत्सव निर्विघ्नपणे पार पडणे गरजेचे असते, परंतु यंदा उत्सवाच्या रंगाचा बेरंग झाला आहे.



# शाहरुख खानला झाला उष्माघाताचा त्रास; वयाच्या पन्नाशीनंतर निर्जलीकरण कसे टाळावे?

बॉलीवूड सुपरस्टार शाहरुख खानला ४५ अंश तापमान असलेल्या उष्णतेमध्ये कोलकाता नाईट रायडर्स या त्याच्या संघाचा जयजयकार करणे चांगलेच महागात पडले. मंगळवारी कोलकाता नाईट रायडर्स आणि सनरायजर्स हैदराबाद यांच्यातील इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) सामना पाहण्यासाठी हा अभिनेता अहमदाबादमध्ये आला होता. या सामन्यादरम्यान निर्जलीकरण (शरीरातील पाण्याची पातळी कमी होणे) आणि उष्माघातामुळे त्याला अहमदाबाद येथील रुग्णालयात दाखल करावे लागले. शाहरुख खानचे वय सध्या ५८ वर्षे आहे. तो आपल्या आरोग्याची योग्य रीतीने काळजीदेखील घेतो. पण डॉक्टर सांगतात, तुम्ही कितीही तंदुरुस्त असलात तरी बराच काळ उच्च तापमानाच्या संपर्कात राहिल्यास तुमच्या शरीरावर विपरीत परिणाम होऊ शकतो.तुमचे वय ५० पेक्षा जास्त असल्यास आणि उच्च रक्तदाब व मधुमेह यांसारखे आजार असल्यास निर्जलीकरण आणि अतिउष्णतेचा तुमच्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो, असे नवी दिल्ली येथील सर गंगाराम हॉस्पिटलमधील अंतर्गत औषध विभागाचे वरिष्ठ सल्लागार डॉ. एम. वाली यांनी द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना सांगितले.



उष्माघाताच्या वेळी शरीरात नक्की काय होते? उच्च तापमानाशी संपर्क आणि भरपूर घाम येणे यांमुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होते आणि शरीराचे तापमान वाढते. शरीराची सहानुभूतीशील मज्जासंस्था सक्रिय होते. याचा अर्थ शरीराला संकटाची परिस्थिती जाणवते आणि शरीर तणाव हॉर्मोन्स सोडण्यास सुरुवात करते. कमी पाण्यामुळे रक्ताचे प्रमाणही कमी होऊन घट्ट होत जाते आणि रक्त अधिक प्रमाणात पंप करण्यासाठी हृदय आणि रक्तवाहिन्यांवर जास्त ताण येतो; ज्यामुळे त्वचेमध्ये उष्णता लवकर पसरू शकते. उष्माघातानंतर शरीर त्याचे तापमान नियंत्रित करू शकत नाही. घाम येणे व बाष्पीभवन या क्रिया होणे कठीण होऊन बसते आणि त्यामुळे शरीराचे तापमान सामान्य राहू शकत नाही. जेव्हा उष्माघात होतो तेव्हा शरीराचे तापमान १० ते १५ मिनिटांत १०४ओऋ(फॅरेनहाइट) किंवा त्याहून अधिक वाढू शकते. म्हणूनच रुग्णाला थंड वातावरणात ठेवून सलाइनद्वारे शरीराचे तापमान कमी करावे लागते. मानेवर, हाताखाली व मांडीच्या भागात बर्फाचे पॅक्स ठेवतात; ज्यामुळे शरीराचे तापमान स्थिर राहू शकेल, असेडॉ. वाली यांनी सांगितले.

निर्जलीकरणाची लक्षणे काय? वाढत्या वयानुसार तुम्हाला ते का जाणवत नाही?

डॉ. वाली यांच्या मते, तुम्हाला लघवी किती वेळा होतेय याकडे लक्ष द्या. निर्जलीकरण झाल्यास लघवी होण्याचे प्रमाण कमी होऊ शकते. मूत्राचा रंगही गडद पिवळा असू शकतो. तुमचे तोंड कोरडे होऊ शकते, अस्वस्थ वाटू शकते, डोकेदुखी, ताप, धाप लागणे, हृदयाची गती वाढणे आणि रक्तदाब कमी होऊ शकतो. आपण जेव्हा लहान असतो तेव्हा शरीर पाण्याची गरज असल्याचे लक्षण दर्शवते. पण जसजसे आपले वय वाढते तसतसे शरीराला पाण्याची गरज असल्याची लक्षणे जाणवत नाहीत. त्यामुळे तुमच्या शरीराला कार्य करण्यासाठी द्रवपदार्थांची गरज भासत असली तरीही तुम्हाला पुरेशी तहान लागणार नाही. त्यामुळे पुरेसे पाणी न प्यायल्याने तुम्हाला निर्जलीकरणाचा धोका असतो.

आपण निर्जलीकरण कसे टाळू शकतो?

तुम्ही किती पाणी प्यावे?

निर्जलीकरण टाळण्यासाठी लोकांनी उच्च तापमान असलेल्या दिवसांत किमान चार ते सहा लिटर पाणी प्यावे. तासानंतर पाणी, फळांचे रस किंवा बेल ज्यूस (उष्णतेचा उत्तम प्रतिकार करणारे) पित राहा. तुम्हाला तहान लागली आहे, असे वाटत नसले तरीही तुम्हाला इलेक्ट्रोलाइट्स असलेले पेय पिणे आवश्यक आहे; जेणेकरून तुम्ही घामामुळे गमावलेले शरीरातील क्षार भरून काढू शकता. तुम्ही ट्रॅफिकमध्ये अडकणे टाळू शकत नसल्यामुळे तुमच्याबरोबर नेहमी पाण्याची बाटली ठेवा. लक्षात ठेवा थंडगार बीअर निर्जलीकरण करते आणि मज्जासंस्थेमध्ये बदल घडवून आणते. धूम्रपान आणि मद्यपानाचे प्रमाण मर्यादित करा, असे डॉ. वाली सांगतात.

उन्हात बाहेर पडताना तुम्ही काय करावे? दुपारी सर्वांत अधिक उष्णतेच्या वेळी घरामध्ये राहणे चांगले आहे. परंतु, जर एखाद्याला बाहेर पडायचे असेल, तर थेट उन्हापासून स्वतःचे संरक्षण करा. हलके, सैलसर, सुती कपडे वापरा. परावर्तित पांढरी छत्री सोबत ठेवा. तुम्हाला ज्या ठिकाणी जायचे आहे तिथे पोहोचण्याच्या १० मिनिटे आधी तुमच्या कारचा एसी बंद करा. पार्किंग करताना खिडक्या उघड्या ठेवा. उन्हात गाडी तापत असल्यामुळे पुन्हा गाडी बसण्याआधी काही वेळ ती थंड होऊ द्या. त्यासाठी काही काळ दरवाजे किंवा खिडक्या उघड्या ठेवा, असे डॉ. वाली सुचवतात.

# सह्याद्रीचा माथा : मतदान पार पाडा, अन् लगेच इकडे लक्ष द्या!

लोकशाहीचा सर्वांत मोठा उत्सव मानल्या जाणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकांचा राज्यातील शेवटचा टप्पा सोमवारी (ता. २०) संपेल. नाशिक, दिंडोरी आणि धुळे या उत्तर महाराष्ट्रातील तीन मतदारसंघांमध्ये मतदान पार पडणार आहे. नाशिक आणि धुळे जिल्ह्यातील प्रशासनाने मतदानाची जय्यत तयारी केली. राजकीय सभांमधून राष्ट्रीय, राज्यस्तरीय नेत्यांनी धुरळा उडवून दिला. या सगळ्या धामधुमीत पाणीटंचाई आणि दुष्काळाचे सगळेच मुद्दे गायब होते. जिल्हाधिकाऱ्यांसह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारीही निवडणुकीच्या कामात गुंतलेले आहेत. त्यामुळे मंगळवार (ता. २१)पासून जगण्या-मरणाच्या प्रश्नांकडे अधिकाऱ्यांसह सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांनी लक्ष पुरवावे, अशी रास्त अपेक्षा आहे. उत्तर महाराष्ट्रात गेला महिनाभर निवडणुकीच्या प्रशासकीय तयारीपासून ते प्रत्यक्ष मतदानापर्यंतच्या व्यवस्थेत निम्म्यापेक्षा जास्त प्रशासकीय यंत्रणा गुंतलेली होती.

दर पाच वर्षांनी येणारा हा लोकशाहीचा उत्सव साजरा करताना दुसरीकडे सामान्य जनतेपुढे आ वासून उभ्या असलेल्या अनेक प्रश्नांकडे बऱ्यापैकी दुर्लक्ष झाले आहे. शासकीय कर्मचारी निवडणूक प्रक्रियेत असल्याने अनेक ठिकाणी लोकांच्या कामांऐवजी 'आता निवडणूक सुरू आहे, ती संपल्यावरच या' अशीही उत्तरे ऐकायला मिळाली. पाणीप्रश्नाची तीव्रता अजगराच्या विळख्याप्रमाणे घट्ट होत चालली आहे.

अनेक तालुक्यांच्या ठिकाणी दोन ते पाच दिवसांनी होत असलेला पाणीपुरवठा अन् ग्रामीण भागात हंडाभर पाण्यासाठी होणारी वणवण थांबावी, यासाठी आता प्रशासनासह सर्व राजकीय नेत्यांनी मतदान प्रक्रिया आटोपल्यावर सर्वाधिक प्राधान्याने काम करायला हवे. लोकसभा निवडणुकांबरोबर यंदा पाणीटंचाई, दुष्काळाची तीव्रता हातात हात घालून सुरू झाली, असे म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल, अशी संपूर्ण उत्तर महाराष्ट्रातील स्थिती होती.

एकीकडे दुष्काळामुळे शेती उत्पादनातील घट, बाजारभावातील घसरण व पिण्याच्या पाण्यासाठी धावाधाव आणि दुसरीकडे निवडणुकीचा बिगुल अशा दोन टोकाच्या परिस्थितीत जनता, प्रशासकीय यंत्रणा आणि राजकीय नेते आदी सर्वच घटक व्यग्र होते. मात्र, निवडणुकीच्या धामधुमीत जनतेच्या दैनंदिन प्रश्नांकडे तसे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष झाल्याचा अनुभव जनतेला या दीड महिन्यात आला. कर्मचारी निवडणुकीच्या कामात असल्याने अनेक ठिकाणी प्रशासकीय यंत्रणा विस्कळित झाली, अगदी ठप्प झाली, असे म्हणता येईल. निवडणुका असल्या की अशी स्थिती येतेच; पण त्याचबरोबर जनतेच्या महत्त्वाच्या कामांकडेही दुर्लक्ष होता कामा नये, हेही अभिप्रेत असते. पण, यंदा मात्र काही अपवाद वगळता तसे झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

मतदान प्रक्रियेनंतर या विषयांना गती यावी, ही जनतेची अपेक्षा आहे. मतदानानंतर प्रशासकीय यंत्रणेला सुटकेचा निःश्वास सोडता येणार नाही. त्यांना पुन्हा दैनंदिन कामात जुंपून घ्यावे लागेल, अशी स्थिती यंदाच्या दुष्काळी आणि वळिवाच्या पावसाने उभी केली आहे, हे विसरता कामा नये. उत्तर महाराष्ट्रातील सहा लोकसभा मतदारसंघांमध्ये सुरवातीला एकतर्फी वाटणारी निवडणूक मधल्या टप्प्यात गती घेत अंतिम टप्प्यात कमालीची निकराची होत आहे.

या रणधुमाळीत राजकीय नेत्यांकडून वारेमाप आश्वासनांची खैरात दिली गेली. राजकीय, धार्मिक ध्रुवीकरणाचा प्रयत्नही झाला. मात्र, दुष्काळ, महागाई, शेतमालाला बाजारभाव नसल्याने वैतागलेली जनता प्रथमच नेत्यांना थेट प्रश्न करून निरुत्तर करून गेल्याचेही पाहायला मिळाले. अगदी शेतीमालाच्या भावावरून, रखडलेल्या सिंचन प्रकल्पावरूनही नेत्यांना जनतेचे ऐकून घ्यावे लागले.एकीकडे हे चित्र असताना सामान्य लोकांना दैनंदिन कामांसाठी शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत होते. जिल्हा परिषदेसारख्या यंत्रणा आचारसंहितेच्या चौकटीबाहेर; पण जनतेच्या जिव्हाळ्याचे प्रश्न सोडवू शकत नव्हत्या. किंबहुना, अमूक एक अधिकारी, कर्मचारी निवडणुकीच्या ड्यूटीवर आहेत, त्यामुळे 'निवडणूक संपल्यावरच या' असे सांगून खेड्यातून आलेल्या जनतेची बोळवण केली जात होती.

# तुमच्या 'या' सवयीमुळे मानेवर येऊ शकतो २७ किलोचा भार; स्क्रीन बघण्याची योग्य पद्धत कोणती? समजून घ्या तज्ज्ञांचे गणित

नऊ ते दहा तास लॅपटॉप, संगणकावर काम करणे, सतत मोबाईल स्क्रोल करीत बसणे आदी कारणांमुळे अनेकदा मान किंवा पाठ दुखते. लहान मुलांपासून ते अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच बेडवर पडून किंवा झोपून काम करण्याची व तासन् तास मोबाईल स्क्रोल करण्याची सवय असते. त्यामुळे अनेकदा पाठीवर व मानेवर ताण पडतो. तेव्हा अनेकदा आई किंवा घरातील काही वृद्ध मंडळी आपल्याला नीट बस, असे वारंवार सांगतात. पण, मोबाईल किंवा लॅपटॉप वापरताना तुम्हाला नेहमी सरळ बसण्याचा सल्ला का दिला जातो याचा कधी विचार केलाय? नाही तर आज आपण याचबद्दल या लेखातून अधिक जाणून घेणार आहोत.



तुमचा मोबाईल, टीव्ही, लॅपटॉप पाहताना चुकीच्या रीतीने बसण्याच्या पद्धतीमुळे तुम्हाला मानेचा दीर्घकालीन त्रास होऊ शकतो. इन्स्टाग्रामवरील एका व्हायरल व्हिडीओमध्ये कंटेंट क्रिएटर शिवम अहलावत यांनी तुमच्या बसण्याच्या पद्धतीनुसार तुमच्या मानेवर कसा भार पडतो हे स्पष्ट केले आहे.

तर याचसंबंधित अधिक माहिती जाणून घेण्यासाठी द इंडियन एक्स्प्रेसने मॅक्स हॉस्पिटलचे असोसिएट डायरेक्टर, ऑर्थोपेडिक्स आणि जॉइंट रिप्लेसमेंट डॉक्टर अखिलेश यादव आणि वैशाली यांनी मानेच्या मणक्याची शारीरयांत्रिकी (बायोमेकॅनिक्स) क्लिष्ट माहिती सोप्या रीतीने समजावून सांगितली आणि मानेच्या वेगवेगळ्या कोनातून कशा प्रकारे तुम्हाला वेदना होऊ शकतात ते स्पष्ट केले आहे.

डॉटरांच्या म्हणण्यानुसार- पुढील पोझिशन्समध्ये असताना फोनकडे किंवा इतर गॅजेट्सकडे जास्त वेळ पाहू नका

तुम्ही सरळ किंवा ० डिग्रीमध्ये बसता तेव्हा मानेवर पाच किलो वजन येते.

जेव्हा तुम्ही १५ डिग्रीमध्ये बसता तेव्हा मानेवर १२ किलोचे वजन येते.

तुम्ही ३० डिग्रीमध्ये बसलेले असताना मानेवर १८ किलो,तर ४५ डिग्रीमध्ये मानेवर २२ किलो वजन येते.आणि ६० डिग्रीमध्ये - मानेवर २७ किलो वजन येऊ शकते.

तुमचा फोन किंवा इतर गॅजेट्स वापरत असताना तुम्ही हे अँगल वापरत असाल, तर वेळीच टाळा. कारण- त्यामुळे तुमच्या मानेत वेदना होऊ शकतात आणि याचे गंभीर परिणाम तुम्हाला सहन करावे लागू शकतात.

मग यावर उपाय म्हणून तज्ज्ञ काय सुचवतात? मानेच्या मणक्याचे गुंतागुंतीचे शारीरयांत्रिकी (बायोमेकॅनिक्स) समजून घेतल्याने मानेवर वेगवेगळ्या कोनांतून कसा दाब येऊ शकतो हे तुमच्या लक्षात येईल. मान जेव्हा ताठ स्थितीत असते. तेव्हा डोक्याचे वजन सर्व्हिकल व्हर्टेब्रे , इंटरव्हर्टेब्रल डिस्क आणि आधार देणाऱ्या स्नायूच्या बाजूने समान रीतीने विखुरलेले असते आणि तेव्हा मानेवर ताण कमी येतो. पण, जेव्हा आपण दीर्घकाळ चुकीच्या आसन पद्धतीत मोबाईल स्क्रोल करतो तेव्हा गुरुत्वाकर्षण शक्ती डोक्याचे वजन वाढवते आणि मग आपण मान वाकवतो; ज्यामुळे मानेच्या संरचनेवर दबाव वाढतो. या वाढलेल्या ताणामुळे स्नायू, लिगामेंट व डिस्कवर ताण पडतो; ज्यामुळे अस्वस्थता आणि कालांतराने स्ट्रक्चरल डॅमेजदेखील होऊ शकते, असे डॉक्टर यादव यांनी सांगितले.

दुसरीकडे व्यवस्थित स्थितीत बसल्याने डोक्याच्या वजनाचे एकसमान वितरण होण्यास प्रोत्साहन मिळते; ज्यामुळे मानेच्या मणक्यावरील जास्त ताण येण्याचा धोका कमी होतो. डॉक्टर यादव यांनी स्पष्ट केले की, रुग्ण वारंवार डोकेदुखी, मानदुखी किंवा रेडिएटिंग अस्वस्थतेची तक्रार करतात; तेव्हा ती लक्षणे सहसा दीर्घकाळ गॅजेट्स पाहणे किंवा वारंवार ताणतणाव आल्यामुळे उदभवतात, असे डॉक्टर यादव म्हणाले आहेत.

या समस्येवर काही उपचार आहेत का? मजबूत स्नायूसाठी शारीरिक उपचार किंवा बर्फ थेरपी आदी गोष्टी मदत करू शकतात. आसनांचे महत्त्व ठळकपणे दर्शविते की, ते दीर्घकालीन मणक्याचे आरोग्य राखण्यासाठी आणि वातसंबंधित समस्या टाळण्यासाठी महत्त्वाचे आहे.

# मलेरियाच्या विरोधात लढण्यासाठी शास्त्रज्ञांनी विकसित केली नवीन लस, जेएनयू विद्यापीठाचे संशोधन

जगभरात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू हा मलेरिया आजारामुळे होतो. हा एक गंभीर आजार आहे. डासांमार्फत होणाऱ्या या आजारावर वेळीच उपचार नाही केले तर रूग्णाला मृत्यू येऊ शकतो. परंतु, या मलेरिया आजारावर नुकतीच एक लस शोधण्यात आली आहे.

दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या टीमने ही मलेरियावरील लस विकसित केली आहे. ही लस मलेरियाविरूद्ध अधिक प्रभावी आणि आजाराला प्रतिबंध घालण्यासाठी उपयुक्त ठरू शकते.

समोर आले आहे.जेएनयू टीमने नेमके काय केले?

स्पेशल सेंटर फॉर मॉलिक्यूलर मेडिसनच्या जेएनयूमधील प्राध्यापिका शैलजा सिंह आणि प्राध्यापक आनंद रंगनाथन यांच्या नेतृत्वाखालील झालेल्या या संशोधनात एक नवीन होस्ट-परजीवी इंटरॅक्टिंग कॉम्प्लेक्स ओळखले आहे. जे एक यशस्वी लस धोरण अनलॉक करण्याची एक महत्वाची गुरूकिल्ली असू शकते.

दरम्यान, या संदर्भात बोलताना प्राध्यापिका शैलजा सिंह म्हणाल्या की,




सेल प्रेसच्या ळडलळशपलश एका जर्नलमध्ये त्यांचे संशोधन प्रकाशित करण्यात आले आहे. त्यांचे हे संशोधन लस विकसित करण्यासाठी परजीवी प्रोहायबिटिन प्रोटिनचे एक नवीन लक्ष्य म्हणून समोर आले आहे. मलेरिया हा आजार मादी नोफिलीस डासाद्वारे पसरणारा एक वेक्टर-जनित रोग आहे.

या आजाराने आतापर्यंत लाखो लोकांचा बळी घेतला आहे. या आजारावर आतापर्यंत सतत संशोधन आणि प्रयत्न करण्यात आले आहे, तरी देखील जागतिक आरोग्य संघटनेच्या २०२२ च्या अहवालात जगभरात २४९ दशलक्ष प्रकरणे आणि ६० हजार ८०० मृत्यूंसह एक भीषण चित्र

आमच्या संशोधनात आम्ही एक नवीन रिसेप्टर लिगँड जोडी ओळखली आहे. ही जोडी परजीवीला मानवी शरीराच्या आत संसर्ग होण्यास मदत करते. यावर आता परजीवी प्रोटिन झक्ष२ एक ताकदवान लस म्हणून काम करू शकते.

दरम्यान संशोधकांनी हे शोधून काढले आहे की, मेरोजोइटच्या पृष्ठभागावर आढळून येणारे झषझक्ष२ प्रोटिन लाल रक्तपेशींच्या पृष्ठभागावरील हीट-शॉक प्रोटिन सोबत क्रिया करते. विशेष म्हणजे या अँटीबॉडी उपचारांमुळे यामध्ये व्यत्यय आणल, ज्यामुळे परजीवीची वाढ पूर्णपणे थांबली

# महिलांच्या प्रत्येक समस्येवर रामबाण आहे बद्धकोणासन, जाणून घ्या सरावाची पद्धत अन् फायदे

मासिक पाळीच्या दरम्यान महिलांना मोठ्या प्रमाणात वेदना होणे हे स्वाभाविक आहे. या वेदनांसोबतच अस्वस्थता, थकवा आणि अशक्तपणा देखील जाणवतो. काही महिलांना तर याचा मोठ्या प्रमाणात त्रास होतो. या समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी काही महिलांना औषधांची मदत देखील घ्यावी लागते.परंतु, या समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी तुम्ही योगाची देखील मदत घेऊ शकता. जर तुम्ही नियमितपणे योगाभ्यास केला तर, मासिक पाळीदरम्यान येणाऱ्या अनेक समस्यांपासून तुम्हाला आराम मिळू शकतो. योगासनांमध्ये विविध योगासनांचा समावेश असतो.

या आसनांपैकी एक असलेले बद्धकोणासन केल्याने मासिक पाळीच्या समस्यांपासून आराम मिळू शकतो. त्यासाठी या आसनाचा दररोज सराव करणे गरजेचे आहे. चला तर मग जाणून घेऊयात बद्धकोणासन करण्याची योग्य पद्धत अन् फायदे कोणते?

बद्धकोणासन करण्याची योग्य पद्धत :

बद्धकोणासन करण्यासाठी सर्वात आधी पाय पसरून सरळ बसा. आता तुमचे दोन्ही पाय आतल्या बाजूस वळवा.




या स्थितीमध्ये तुमचे दोन्ही पायांचे तळवे एकमेकांना स्पर्श करतील, याची काळजी घ्या.

त्यानंतर, तुमच्या दोन्ही पायांचे तळवे तुमच्या दोन्ही हातांनी धरा.

आता या स्थितीमध्ये दीर्घ श्वास घ्या आणि हात-पाय ताठ ठेवा.

तुम्हाला आता शरीरात ताण जाणवेल. काही सेकंद या स्थितीमध्ये राहिल्यानंतर, हळूहळू श्वास सोडा.

आता श्वास सोडताना तुमचे दोन्ही गुडघे, मांड्या जमिनीच्या दिशेने न्या.

आता तुमचे दोन्ही पाय फुलपाखरासारखे वर आणि खाली हलवण्याचा प्रयत्न करा. हळूहळू तुमचा वेग वाढवा.

त्यानंतर, सामान्य स्थितीमध्ये परत या.

बद्धकोणासन करण्याचे आरोग्यदायी फायदे :

बद्धकोणासन नियमित केल्याने शरीराचा थकवा दूर होण्यास मदत होते.

हे योगासन दररोज केल्याने रजोनिवृत्तीच्या लक्षणांपासून मुक्त होण्यास देखील मदत करते.

बद्धकोणासन केल्याने मांड्या आणि गुडघ्यांचे स्नायू मजबूत होतात आणि शरीर लवचिक होण्यास फायदा होतो.

बद्धकोणासन केल्याने प्रसूती सुलभ होऊ शकते.

हे योगासन नियमित केल्याने मासिक पाळीमध्ये होणारा त्रास कमी होतो.

# बुद्धाची भुमी म्हणुन भारताची जगभरात ओळख. केशव कांबळे.







लातूरः दि.२३. २५६८व्या बुद्धजयंती निमित्ताने वैशाली बुद्धविहार बौद्धनगर लातूर येथे धम्मध्वजारोहण व सामुदायिक बुद्धवंदनेचाकार्यक्रम संपन्न झाला. यावेळी सुर्यभान लातूरकर,दामु कोरडे,अशोकराव सातपुते,जगन्नाथ सुरवसे,यांचे हास्ते भ. बुद्धाच्या प्रतिमेस व डा बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प–धुप–दिपाने पुजा करण्यात आली तर सुर्यभान लातूरकर यांचे हास्ते धम्म ध्वजारोहण करण्यात आले.

या प्रसंगी बोलताना केशव कांबळे म्हणाले की ,बुद्ध हा भारताचा भुमीपुत्र आहे.सिद्धार्थ गौतमाने राजवैभवाचा त्याग करुन समाजात आसणार्या कलहा वर लक्ष केंद्रित करुन माणसा–माणसातला कलह कसा नष्ट होईल ? याविचाराने चित्ताची एकाग्रता साधुन वैशाख पौर्णिमेला नव्या ज्ञानाची प्राप्ती करुन ते सम्यक सम्बुद्ध झाले.

माणुस केंद्रबिंदु माणुनमाणसाचं *मन*प्रधान आहे. त्या मनाला निर्मळबनवणारे तत्वज्ञान भ.बुद्धाने सांगितले .माणसातील राग ,लोभ,द्वेष हे विकार मानव जातीला नाशाकडे घेवुन जातात तर प्रेम ,करुणा,शांती ,बंधुत्वाचा विचारमाणसाला श्रेष्ठत्व बहालकरतात. समतेमुळे माणुस जोडला जातो तरविषमतेने माणुस माणसापासुन तोडला जातो,म्हणुनसमताधिष्ठीत समाजरचनाहि बुद्धाची जगाला देण आहे. याचमहान तत्वज्ञानाकडे जग आकर्षित झाले म्हणुन आज भारतालाजग बुद्धाचीभुमी म्हणुन ओळखते. आसे मनोगत व्यक्त केले. शेवटी धम्मपालन गाथेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## लातुर शहरातील श्रावस्ती बुद्ध विहारात २५६८वी बुद्ध जयंती साजरी.



लातूर :– श्रावस्ती बुद्ध विहार ट्रस्ट संचलीत श्रावस्ती बुद्ध विहारात विहाराचे अध्यक्ष देविदासबाबा आचार्यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रमुख पाहुणे सतीश सुरवसे ,कथाकार,पुणे.तर प्रमुख ऊपस्थिती कुसुम बानाटे,अध्यक्षा,श्रावस्तीबुद्ध विहार महिला मंडळ,रागीणी यादव,नगरसेविका,प्र.क्र.११मनपा लातुर,राहुल कांबळे,अध्यक्ष,भिमजयंती ऊत्सव समीती विक्रमनगर,यांच्या मंगल हस्ते धुप,दीप,पुष्पाने तथागताला नि ब्बाभिमाला वंदन केले.सतीश सुरवसे सरांच्या हस्ते धम्मध्वजाचे ध्वजारोहण करुन धम्मध्वजाला मानवंदना देत,प्रतिभा सावळेंच्या नेतृत्वात बुद्ध वंदना घेतली.यावेळी पाहुण्यांचे पुष्पहाराने स्वागत केले.यावेळी कथाकार सतीश सुरवसे म्हणाले धम्माचरणाने मानवी जिवनातील दुखं नाहीसे होऊन जिवन सुखकर,समृद्ध होते.यासाठी धम्म जगा.तर रागीणी यादव यांनी धम्मविचाराने जिवनात समृद्धी येते,सन्मान प्राप्त होतो.यासाठी धम्माचे आचरण करण्याचा सल्ला दिला.तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक,संचलन विहाराचे सचीव विलास घारगावकरनी केले.यावेळी आश्वीनी राहुल कांबळे यांनी खीरदान केली तर रमेशभाऊ सरवदेंनी जिलेबी वाटप केली.यावेळी परिसरातील लहानथोरांची ऊपस्थिती खुपच चांगली दिसली.

# सोयाबीनला ४५०० भाव; अन् ३० किलोच्या बॅगला ३२०० रुपये,

## तुम्हीच सांगा पेरावं काय अन् जगावं कसं; शेतकरी झाला हवालदिल,

किनवट . प्रतिनिधी. (शेख शौकत) : भाव वाढतील या आशेने आजही ३० टक्के शेतकरी सोयाबीन घरातच साठवून ठेवून आहे; पण भाव काही वाढेना. ४ हजार ५०० च्या पुढे भाव सरकेना. अशातच आता खरीप हंगामात पेरणीसाठी ३० किलो सोयाबीन बियाणाला ३२०० ते ३५०० रुपये मोजावे लागत आहेत. तुम्हीच सांगा काय शेतकरी वरी येईल, असा सूर हवालदिल शेतकऱ्यांच्या तोंडून ऐकायला मिळत आहे. सोयाबीन पिकाचा उतारा एका बेंगला एकरी पाच ते सहा क्विंटल येतो. लाव लागवड व इतर पूर्ण खर्च लावला तर शेतकऱ्यांना काहीच उरत नाही. एक तर पिकाचा उतारा कमी आणि उत्पादित मालाला भावही मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडत नसल्याचे चित्र आहे. सोयाबीनच्या पिकापोटी सर्व खर्च येतो १५ हजारी ते १५ हजार ५०० रुपये उत्पन्न मिळते. २७ हजार रुपये हातात येतात, काय उरते, मग तुम्हीच सांगा कसा काय शेतकरी वरी येईल? असे शेतकरी बोलून दाखवीत आहेत.



एकरी सोयाबीन लागवडी पोटी येणारा खर्च या प्रमाणे :नांगरणी८०० रुपये, रोटावेटर८०० रुपये, पेरणी८०० रुपये, बियाणे बॅग३२०० रुपये, खत२५०० रुपये, फवारणी२५०० रुपये, सोयाबीन कापणी ३००० रुपये, मळणी यंत्रात काढणी २००० रुपये, (असा जवळपास १६००० रुपये खर्च येतो) शेतमालाला भाव मिळाला तरच प्रगती...

सोयाबीन पीक पावसाळ्यात अतिप्रमाणात पाऊस झाला तर कधी कधी शेतकऱ्यांच्या हातीच लागलेले नाही. अशा पेचप्रसंगात दुष्काळाचे गडद सावट शेतकऱ्यांवर उभे राहते. मग अशी परिस्थिती निर्माण होते की, 'पिकली तर शेती नाही तर जिवाची माती' अशावेळी शासनाकडून कोणतीही भरीव मदत मिळत नाही. शासनाने शेतमालाला चांगला भाव दिल्याशिवाय प्रगती होणार नाही, असे शेतकरी बोलू लागले आहेत.

:सालगडी ठेवणे झाले अवघड?

दिवसेंदिवस ही परिस्थिती कायम असल्याने कर्जाच्या खाईतच शेतकरी ढकलला जात आहे. सालगडी ठेवणे अवघड झाल्याने शेतकरी रोजंदा रीवर शेतमजु रांकडून कामे करून घेतात त्यांच्याकडूनही आता अडवणूक होत आहे. शेतमजुरीचे दरदेखील मनमा– नीपणे वाढले आहेत. शेतकरी पेरणी, आंतरमशागती यासाठी लहान ट्रॅक्टरचा वापर करतात. मात्र, पेट्रोल, डिझेलचे दर वाढल्याने मशागतीचे दर देखील वाढले आहेत. त्यामुळे शेती करणे अवघड झाले आहे. अनेकांनी शेती करणे सोडून दिले आहे.

# स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकात शिवकालीन दुर्मिळ नाणी (शिवराई) व गडकिल्ल्यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन.

## शिवरायांची प्रतिमा असलेल्या दोन रुपयांच्या २२,२२२ नाण्यांनी साकारलेली शिवप्रतिमा.

मुंबई : – शिवकाळाचा वेध घेण्यासाठी झपाटलेले संग्राहक श्री रंजन गावडे यांनी शिवराजाभिषेकाच्या ३५० व्या सोहळ्यानिमित्त मुंबई दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकात दिनांक २५ आणि २६ मे २०२४ रोजी सकाळी ११.०० ते रात्री ९.०० या कालावधीत शिवकालीन दुर्मिळ नाणी (शिवराई), भारतीय आणि परदेशी नोटा व नाणी आणि वस्तू तसेच त्यांनी काढलेल्या गडकिल्ल्यांच्या छायाचित्रांचे गाथा शिवशौर्याची हे प्रदर्शन आयोजित केले आहे. शिवरायांची प्रतिमा असलेल्या दोन रुपयांच्या २२,२२२ नाण्यांनी साकारलेली शिवप्रतिमा हे या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण असणार आहे. मुंबई,कोलकाता,नोयडा आणि हैद्राबाद




मिंट येथील नोटांचा यात समावेश आहे. या प्रदर्शनाचा हेतू व्यक्त प्रतिपादन करताना रंजन गावडे म्हणाले की, एक इतिहासप्रेमी या नात्याने शिवरायांच्या प्रेरणादायी इतिहासाचा समाजामध्ये प्रचार व प्रसार करणे हे मी माझे आद्य कर्तव्य समजतो. श्री शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समिती, दुर्गराज रायगड यांच्या विशेष सहकार्याने होत असलेल्या या प्रदर्शनाच्या निमित्ताने इतिहासप्रेमींना पुन्हा एकदा शिवरायांच्या विषयी अभिमान बाळगण्याची तसेच शिवराय अनुभवण्याची अमूल्य संधी मिळणार आहे. त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे,

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यासोबत शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सहृदय सत्कार संपन्न

सीबीएसई आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२४मध्ये उत्तीर्ण विद्यार्थी आणि शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केला सहृदय सत्कार

लातूर :– श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील प्राचार्य कक्षामध्ये सीबीएसई आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२४मध्ये उत्तीर्ण विद्यार्थी आणि शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी शाल, स्मृतिचिन्ह, पुष्पहार आणि पेढे देऊन सहृदय सत्कार केला. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्रचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, डॉ. बाळासाहेब गोडबोले, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख तथा रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. डॉ. अश्विनी रोडे (बेडगे) यांची कन्या कु. रेणुका बेडगे, प्रा. रवींद्र सुरवसे यांचे सुपुत्र प्रज्वल सुरवसे, प्रा. विश्वनाथ स्वामी यांची कन्या कु. वैष्णवी स्वामी व कु. शांभवी स्वामी, प्रा. एम. व्ही.पटणे यांचे चिरंजीव विपुल तांदळे, रंगनाथ लांडगे यांची कन्या कु. श्रद्धा लांडगे आणि राजाभाऊ बोडके यांची कन्या कु. मधुरा बोडके या सर्वाचा शाल, स्मृतिचिन्ह, पुष्पहार आणि पेढे देऊन सहृदय सत्कार केला. यावेळी गुणवत्ताधारक विद्यार्थी मनोगते व्यक्त करताना म्हणाले की, सातत्यपूर्ण अभ्यास, वेळेचे नियोजन, मनाचे व्यवस्थापन, कोणत्याही खाजगी शिकवण्या न करता महाविद्यालयातील शिक्षण प्रणाली उपयोग आणि शिक्षकावर विश्वास यामुळेच आम्ही हे संपादन करू शकलो. यावेळी डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. डॉ. अश्विनी रोडे (बेडगे), प्रा. रवींद्र सुरवसे, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. एम. व्ही.पटणे, रंगनाथ लांडगे आणि राजाभाऊ बोडके यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय हा एक परिवार असून परिवारात होणारा आनंद सर्वांनी मिळून साजरा करावा. विद्यार्थ्यांची मनोगते ऐकावीत, महाविद्यालयाला गतवैभव प्राप्त करून द्यावे आणि शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये पदवी प्रवेश यासाठी अशा उपक्रमांची नितांत आवश्यकता असल्याचे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. टी. घनश्याम यांनी केले. तर आभार कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता शिवशंकर स्वामी, श्रीशैल्य पाटील, बालाजी डावकरे, संदीप मोरे, अशोक शिंदे, विनायक लोमटे, रत्नेश्वर स्वामी, महादेव स्वामी, यशपाल ढोरमारे, राम पाटील आदींनी परिश्रम घेतले.



# धम्माचे आचरण म्हणजे खरी राष्ट्रभक्ती होय अहमदपूर येथे तथागत बुद्ध पोर्णिमेनिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न

प्रा बालाजी आचार्य अहमदपूर / प्रतिनिधी :– देशांमध्ये अज्ञान आणि अंधश्रद्धे मध्ये वाढ झाली आहे यामुळे देशापुढे अनेक जटील समस्या निर्माण झाल्या असून मनुष्याचे जीवन अधोगतीकडे जात आहे ही परिस्थिती बदलायची असेल तर धम्मशिवाय पर्याय नाही कारण धम्म म्हणजे विज्ञान ,बुद्धिवाद आणि नीतिमता होय तसेच धम्माचे आचरण म्हणजे खरी राष्ट्रभक्ती होय असे प्रतिपादन प्रा बालाजी आचार्य यांनी वैशाख पौर्णिमेनिमित्त तथागत सम्यक समबुद्ध यांच्या जयंतीनिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर तथागत बुद्ध विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला विनम्र अभिवादन करताना केले अहमदपूर येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक युवक मंडळ ,अरुणभाऊ भाऊसाहेब वाघंबर आयोजित तथागत बुद्ध यांची २५६८ वी जयंती अति उत्साहात संपन्न करण्यात आली यावेळी प्रा आचार्य बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रिपाईचे लातूर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे हे होते तर प्रमुख पाहुणे आमदार बाबासाहेब पाटील ,प्रमुख मार्गदर्शक प्रा बालाजी आचार्य ,राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष शिवानंद हेंगणे, महेश अर्बन बॅकेचे उपाध्यक्ष निवृत्तीराव कांबळे , सामाजिक नेते दयानंद वाघमारे , धम्मउपासक शेषराव ससाने , चाकूरचे प्रथम नगराध्यक्ष मिलिंद महालिंगे, माजी नगराध्यक्षा सरस्वती कांबळे , सामाजिक नेते प्रकाश फुलारी ,प्रभाकर गायकवाड ,नागसेन महालिंगे मयूर कांबळे, संदीप महालिंगे, सुर्यकांत कोकाटे , भाजपाचे गोविंदराव गिरी ,पत्रकार बाबासाहेब वाघमारे ,त्रिशरण मोहगावकर, भीमराव कांबळे आयोजक अरुणभाऊ भाऊसाहेब वाघंबर आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी तथागत बुद्ध यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या शुभहस्ते करून आ बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात आले त्यानंतर त्रिशरण ,पंचशील ग्रहण करून महामानवास विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळी आ बाबासाहेब पाटील यांनी सम्यक शुभेच्छा देताना बुद्धाचे तत्त्वज्ञान सर्वांसाठी उपयुक्त आहे असे सांगून बुद्ध पौर्णिमेच्या सदिच्छा दिल्या यावेळी प्रा बालाजी आचार्य पुढे बोलताना म्हणाले की प्रज्ञा ,शील करुणेची आणि सदाचरणाची शिकवण देऊन कर्म सिद्धांत द्वारे मानवाला दुःखमुक्तीचा मार्ग तथागताने दाखविला त्या मार्गाचे अनुसरण केले तर आपले जीवन समृद्ध होईल असे सांगून राष्ट्राच्या उभारणीत धम्माचे अनन्य साधारण असे महत्व आहे असे ही म्हणाले तत्पूर्वी अरुणभाऊ वाघंबर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दयानंद वाघमारे यांनी केले तर आभार सचिन गायकवाड यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बाबासाहेब वाघमारे , शुभम वाघंबर ,आकाश व्यवहारे , बाबुभाई शेख , अंजलीताई वाघंबर , मुन्ना पठाण , चॉद शेख शकुंतला बनसोडे ,रसिका बनसोडे , नगर परिषदेचे कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE